



# संरक्षणशास्त्र

## (कार्यपुस्तिका)

### इयत्ता नववी







शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये ही कार्यपुस्तिका निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# संरक्षणशास्त्र

## (कार्यपुस्तिका)

## इयत्ता नववी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

शेजारचा क्यू आर कोड स्मार्टफोनचा वापर करून स्कॅन करता येतो. स्कॅन केल्यावर आपल्याला या पाठ्यपुस्तकाच्या अध्ययन–अध्यापनासाठी उपयुक्त लिंक/लिंक्स (URL) मिळतील.

प्रथमावृत्ती : २०१७

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**संरक्षणशास्त्र विषय समिती**

प्रा. डॉ. श्रीकांत परांजपे, अध्यक्ष

ब्रिगेडिअर एस. जी. गोखले (निवृत्त), सदस्य

कर्नल प्रमोदन मराठे (निवृत्त), सदस्य

डॉ. विजय जाधव, सदस्य

डॉ. शांताराम बडगुजर, सदस्य

डॉ. अजयकुमार लोळगे, पुणे (सदस्य सचिव)

**नकाशाकार**

श्री. रविकिरण जाधव
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**निमंत्रित**

श्री. वैजनाथ काळे

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. रमेश रामचंद्र माळगे.

**संयोजक**

डॉ. अजयकुमार लोळगे
विशेषाधिकारी कार्यानुभव व
प्र. विशेषाधिकारी, आरोग्य व शारीरिक शिक्षण
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**अक्षरजुळणी**

रूना ग्राफिक्स, पुणे

**निर्मिती**

श्री. सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी

श्री. विनोद गावडे, निर्मिती अधिकारी

श्रीमती मिताली शितप, निर्मिती सहायक अधिकारी

**कागद**

७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**प्रकाशक**

विवेक उत्तम गोसावी,
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता नववीच्या वर्गात तुम्हां सर्वांचे स्वागत आहे. 'संरक्षणशास्त्र' या विषयाची कार्यपुस्तिका तुमच्या हाती देताना आम्हांला विशेष आनंद होत आहे.

भारतीय लष्करी व निमलष्करी दलांची संक्षिप्त माहिती पुस्तिकेत दिलेली आहे. जागतिकीकरणाच्या २१ व्या शतकात आवश्यक असलेली संरक्षणशास्त्र विषयक माहिती आत्मसात करण्यासाठी व संरक्षणशास्त्र क्षेत्रातील करिअरच्या यशस्वी वाटचालीसाठी या विषयातून आवश्यक ते मार्गदर्शन तुम्हांला मिळेल, असा विश्वास वाटतो.

तुम्हांला माहीतच आहे, की संरक्षणशास्त्र विषयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. संरक्षणशास्त्र या कार्यपुस्तिकेचा मूळ हेतू तुमच्यामध्ये राष्ट्रीय सुरक्षा, राष्ट्रहित, देशप्रेम या मूल्यांची जोपासना व्हावी हा आहे. चर्चा, क्षेत्रभेटी, मुलाखत, भूमिका अभिनय अशा अनेक कृतींतून तुम्ही हा विषय अभ्यासणार आहात. हे सर्व उपक्रम तुम्ही आवर्जून करा. या उपक्रमातून तुमच्या विचारप्रक्रियेला चालना मिळेल. चर्चेतून मिळालेले मुद्दे व माहिती लिहण्यासाठी पुस्तिकेत पुरेशी जागा दिलेली आहे. तसेच आवश्यक तेथे तुमच्या शिक्षकांची, पालकांची व वर्गातील सहकाऱ्यांची मदत घ्या.

आजच्या तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात संगणक, स्मार्टफोन हे तर तुमच्या परिचयाचे आहेतच. कार्यपुस्तिकेतून अभ्यास करताना माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या साधनांचा सुयोग्य वापर करा. जेणेकरून तुमचे अध्ययन सुकर होईल.

कार्यपुस्तिका वाचताना, अभ्यासताना आणि समजून घेताना तुम्हांला त्यातील आवडलेला भाग तसेच अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी, पडणारे प्रश्न आम्हांला जरूर कळवा.

तुम्हांला तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा !



(डॉ. सुनिल मगर)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक :** २८ एप्रिल २०१७, अक्षय्यतृतीया
भारतीय सौर : ८ वैशाख १९३९

# संरक्षणशास्त्र (Defence Studies)

**अध्ययन-अध्यापन व उपक्रम राबविण्याच्या संबंधीचा दृष्टिकोन :**

संरक्षणशास्त्र या विषयाचा रोख मुख्यतः राष्ट्रीय सुरक्षा हा आहे. राष्ट्रीय सुरक्षा ही संकल्पना देशासमोरील बाह्य आणि अंतर्गत समस्यांवर लक्ष केंद्रित करते. आज राष्ट्रीय सुरक्षा या संकल्पनेची व्याप्ती केवळ सीमा रक्षणापुरती मर्यादित राहिली नाही. तर त्यामध्ये राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक समस्यांचाही समावेश केला जातो. या विषयातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय सुरक्षा, राष्ट्रहीत, देशप्रेम या मूल्यांची जोपासना व्हावी हा हेतू आहे. भविष्यकाळात या क्षेत्रात करिअर (सेवासंधी) करण्याच्या दृष्टीने या विषयाची उपयुक्तता आहे. इयत्ता नववीच्या 'संरक्षणशास्त्र' या पुस्तकात भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा विषयक समस्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यात प्रामुख्याने राष्ट्रीय सुरक्षा ही संकल्पना आणि भारतीय लष्करी व निमलष्करी दलाची माहिती दिली आहे.

इयत्ता दहावीमध्ये आपत्ती व्यवस्थापन तसेच भारतासमोरील अंतर्गत आव्हाने यांचा अभ्यास करणार आहोत. हे पुस्तक विद्यार्थ्यांनी कार्यपुस्तिका म्हणून वापरावे. यातील आशय अभ्यासून त्यासंबंधी गटात, वर्गात, शिक्षकांसोबत तसेच विषयतज्ज्ञांशी चर्चा करून तसेच काही क्षेत्रभेटी, मुलाखती यांच्या मदतीने या कार्यपुस्तिकेत पाठाखाली दिलेल्या रिकाम्या जागेत माहिती लिहावी. यासाठी विद्यार्थ्यांनी इंटरनेट, वर्तमानपत्रे, वाचनालय संदर्भ, साहित्य यांचा आधार घ्यावा. तसेच विविध क्षेत्रभेटीचे आयोजन शिक्षकांनी करणे अपेक्षित आहे.

**अध्ययन व अध्यापन :**

(१) प्रत्येक पाठ्य घटकाची माहिती थोडक्यात दिलेली आहे. त्या आधारे शिक्षकांनी तो विषय समजावून सांगणे अपेक्षित आहे. त्यासाठी आवश्यक ती संदर्भ सेवा वापरावी.

(२) दिलेल्या पाठ्यांशाचे अध्ययन अधिक प्रभावी व्हावे या दृष्टीने उपक्रमात, प्रत्येक विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग घ्यावा. उपक्रमातील बाबींवर चर्चा करून तो उपक्रम लेखी स्वरूपात पूर्ण करून घ्यावा.

(३) आठवड्यातून एकदा विद्यार्थ्यांकडून वृत्तपत्रे, मासिकातून भारताच्या सुरक्षाविषयक समस्यांबाबतच्या बातम्यांवर चर्चा घडवून विद्यार्थ्यांना स्वमत मांडण्यास संधी द्यावी.

(४) उपलब्ध परिस्थितीनुसार सुचविलेल्या क्षेत्रभेटीचे आयोजन करावे. यातून नेतृत्व-सहकार्य, संवाद-कौशल्ये, विकसन या गुणांचा विकास होईल.

**या विषयाचे मूल्यमापन :**

(१) स्वतंत्र लेखी स्वरूपात परीक्षा नाही.

(२) कार्यपुस्तिकेतील दिलेल्या लेखी कामासाठी ४०% भारांश आहे.

(३) चर्चा, क्षेत्रभेटी, मुलाखत, भूमिका, अभिनय यासाठी ६०% भारांश आहे.

(४) प्राप्त गुणांचे श्रेणीत रूपांतर करून विद्यार्थ्यांना श्रेणी द्यावी.

## संरक्षणशास्त्र विषयक क्षमता : इयत्ता ९ वी

इयत्ता ९ वी च्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.

| अ.क्र. | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| १. | ❍ राष्ट्रीय सुरक्षा<br>❍ राष्ट्रीय सुरक्षा आव्हाने (बहिर्गत) | ❍ राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय मूल्ये वृद्धिंगत करणे.<br>❍ राष्ट्रीय सुरक्षा, राष्ट्रहित या संकल्पना समजावून घेणे.<br>❍ राष्ट्रीय सुरक्षेपुढील बाह्य आव्हाने समजून घेणे.<br>❍ भारत व शेजारील देशाशी असलेले संबंध जाणून घेणे.<br>❍ नकाशा वाचन कौशल्ये विकसित करणे. |
| २. | ❍ भारतीय संरक्षण व्यवस्था<br>❍ भारतीय स्थलसेना<br>❍ भारतीय नौसेना<br>❍ भारतीय वायुसेना | ❍ भारतीय सेनादले, रचना व कार्य समजून घेणे.<br>❍ तिन्ही सेनादलातील शस्त्र-अस्त्रांची माहिती करून घेणे.<br>❍ सेनादलातील अधिकाऱ्यांचे हुद्दे समजून घेणे.<br>❍ संरक्षणातील भारतीय सागरी किनाऱ्याचे व नौसेनेचे महत्व समजून घेणे.<br>❍ राष्ट्रीय आपत्ती काळात सेनादलाचे महत्व जाणणे. |
| ३. | ❍ संरक्षणाच्या दुय्यम संघटना<br>❍ पोलीस संघटना | ❍ देशातील संरक्षणाच्या दुय्यम संघटना व त्यांचे कार्य समजून घेणे.<br>❍ पोलीसदलांचे राष्ट्रीय सुरक्षेतील योगदान अभ्यासणे.<br>❍ दुय्यम संरक्षण दलासंबंधी विविध मुलाखतींमधून प्रेरणा मिळवणे. |
| ४. | ❍ लष्करातील सेवा संधी | ❍ लष्करी सेवेतील सेवा संधी आणि प्रवेश प्रक्रिया समजावून घेणे. |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | राष्ट्रीय सुरक्षा | १ |
| २. | राष्ट्रीय सुरक्षा आव्हाने (बाह्य) | ७ |
| ३. | भारतीय संरक्षण व्यवस्था | १३ |
| ४. | भारतीय स्थलसेना | १९ |
| ५. | भारतीय नौसेना | २६ |
| ६. | भारतीय वायुसेना | ३२ |
| ७. | संरक्षणाच्या दुय्यम संघटना | ४१ |
| ८. | पोलीस दले | ४७ |
| ९. | लष्करातील सेवा संधी | ५१ |

# प्रकरण १ राष्ट्रीय सुरक्षा

## सुरक्षेचा अर्थ

सुरक्षा ही जीवनाची एक आवश्यक गरज आहे. प्राणिमात्रांतील अगदी सामान्य जीवांनादेखील स्व-संरक्षणासाठी शक्ती व साधने याची अनुरूप जोड निसर्गाने करून दिलेली आहे. जी गोष्ट सामान्य प्राणिमात्रांसाठी तीच मानवी जीवनाची आहे.

सुरक्षा ही व्यक्ती, समाज आणि देशाशी निगडित असलेली संकल्पना आहे. सुरक्षा ही शांतता व स्थैर्य निर्माण करते. तसेच अनिश्चिततेपासून संरक्षण देते. राष्ट्राराष्ट्रांमध्ये आव्हाने प्रतिआव्हाने असतात. राष्ट्राचे सार्वभौमत्व, राष्ट्रीय मूल्ये, राष्ट्रीय भूमी यांची जपणूक झाली पाहिजे. प्रादेशिक अखंडता, नागरी जनजीवन आणि राष्ट्रीय साधन संपत्ती याचे परकीय आक्रमणापासून रक्षण करणे म्हणजे राष्ट्रीयत्वाचे रक्षण होय. याचा अर्थ राष्ट्राचे राष्ट्रीयत्व, सार्वभौमत्व टिकविण्यासाठी कार्यवाहीत आणल्या जाणाऱ्या सर्व संरक्षक उपायांना 'राष्ट्रीय सुरक्षा' असे म्हणता येईल.

## भारताचा इतिहास

प्राचीन काळापासून भारताच्या इतिहासाकडे पाहिले असता असे दिसते की, भारतावर वायव्य भागातून परकीयांची जमिनीवरून आक्रमणे झालेली होती. त्या काळात भारतात अनेक राजांच्या अधिपत्याखाली विविध राज्ये होती.

उदा. मौर्य, गुप्त, मराठे यांनी राष्ट्र पातळीवर परकीय आक्रमणाचा प्रतिकार करण्याची क्षमता लोकांत निर्माण केली होती. आपल्या राज्याचे संरक्षण आणि राज्य विस्तार यासाठी संरक्षणाच्या उपाययोजना, आखणी, नियोजन आणि संरक्षण व्यवस्था उभी केल्याचे दिसून येते.

## संकल्पना

राष्ट्रीय सुरक्षेचा विचार करताना काही संकल्पना समजावून घेणे क्रमप्राप्त ठरते. कारण त्यांचा राष्ट्र (देश) आणि राष्ट्रीय सुरक्षा यांच्याशी संबंध आहे. त्यासंबंधीच्या राष्ट्र, राष्ट्रराज्य, राष्ट्रवाद, राष्ट्रहित, राष्ट्रशक्ती आणि राष्ट्रीय सुरक्षा इत्यादी संकल्पना पुढीलप्रमाणे-

- **राष्ट्र :** राष्ट्र म्हणजे एका भौगोलिक प्रदेशात एकच संस्कृती असलेले, एका वंशाचे, धर्माचे किंवा भाषेचे लोक राहतात. त्यांच्यामध्ये ऐक्याची भावना असते त्या प्रदेशाला राष्ट्र असे म्हणतात.

- **राष्ट्रराज्य :** एखादे राष्ट्र राष्ट्रराज्य केव्हा होते ? भूप्रदेश, लोक आणि सार्वभौमत्व या तीन घटकांमुळे राष्ट्र हे राष्ट्रराज्य बनते. भारत हे राष्ट्रराज्य आहे. राष्ट्रराज्यामध्ये अनेक प्रकारची विविधता असू शकते. उदा. भारतात वंशिक, धार्मिक, जातीय, भाषिक, भौगोलिक, आर्थिक अशा विविधता आहेत.

- **राष्ट्रवाद :** राष्ट्रवादाची व्याख्या ही राष्ट्र या संकल्पनेच्या स्पष्टीकरणातच आहे. लोकांच्या देशाबद्दलच्या ज्या

भावना व्यक्त होतात त्यालाच राष्ट्रवाद असे म्हणतात. उदा. भारताच्या राष्ट्रवादाबद्दल जेव्हा आपण बोलतो तेव्हा एकसंघ भारत असे म्हणतो. त्यामध्ये विविध भाषा, धर्म, जात, पंथ असलेल्या लोकांची ओळख भारतीय म्हणून गृहीत असते. म्हणून एकसंघ भारत असे म्हणतो.

❍ **राष्ट्रहित :** राष्ट्रहित हे देशाच्या मूलभूत मूल्यांशी संबंधित असते. ही मूल्ये देशाचा भौगोलिक, विस्तार आणि राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक घटकांच्या आधारे निश्चित केली जातात. ही मूल्ये देशाच्या राज्यघटनेत नमूद केलेली असतात. भारतीय राज्यघटनेच्या घोषणापत्रातच ती नमूद केलेली आहेत. लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, प्रजासत्ताक गणराज्य, संघराज्य पद्धती व समानता ही भारताची मूलभूत मूल्ये आहेत. या मूल्यांमुळे देशाचा सांस्कृतिक इतिहास, संस्कृती, समाज, अर्थव्यवस्था व राज्यसंस्थेचा प्रकार या संबंधीची प्रणाली समजते.

❍ **राष्ट्रीय सामर्थ्य :** देशाची गाभा मूल्ये आणि राष्ट्रहित यांचे रक्षण हे राष्ट्रीय सामर्थ्याच्या साहाय्याने केले जाते. देशाच्या रक्षणाच्या क्षमतेला राष्ट्रीय सामर्थ्य असे म्हणतात. राष्ट्रीय सामर्थ्य हे प्राचीन काळापासून आजपर्यंत राजनीतीच्या केंद्रस्थानी राहिली आहे. म्हणून राष्ट्रीय सामर्थ्य संपादन करण्याचे प्रयत्न प्रत्येक राष्ट्राकडून केले जातात. ज्या देशाचे सामर्थ्य प्रभावी असते तो देश आपले हितसंबंध कोणत्याही क्षेत्रात वाढवण्यास समर्थ ठरतो. प्रत्येक देश आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी इतर राष्ट्रांचे सहकार्य घेतो. आपल्या राष्ट्रहिताच्या दृष्टीने दुसऱ्या देशाशी असलेल्या संबंधांना प्रभावित करण्याच्या क्षमतेला राष्ट्रीय सामर्थ्य म्हणतात.

प्रत्येक राष्ट्र आपल्या अस्तित्वासाठी व स्वहिताचे रक्षण करण्यासाठी आपले राष्ट्रीय सामर्थ्य वाढवण्याचा अनेक प्रकारे प्रयत्न करीत असते.

राष्ट्रीय सामर्थ्य देशातील भौतिक व अभौतिक घटकांच्या साहाय्याने अस्तित्वात येते. भौतिक घटकांमध्ये कोळसा, लोह, पोलाद, इतर खनिजे व पाणी यांसारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा समावेश होतो. यांच्या साहाय्याने राष्ट्राची औद्योगिक क्षमता निर्माण केली जाते. भारताचे अवकाश संशोधन आणि अणुविज्ञान क्षेत्रातील योगदान हे भारताच्या राष्ट्रीय सामर्थ्याच्या निर्मितीमधील मोठा घटक आहे. अभौतिक घटकांमध्ये देशातील लोकसंख्या, त्यांचे मनोधैर्य व लोकांची देशाबाबत असलेली बांधिलकी इत्यादींचा समावेश होतो.

❍ **राष्ट्रीय सुरक्षा :** आपले अस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी केलेल्या उपाययोजनांना सुरक्षा असे म्हणतात. प्रत्येक राष्ट्राला अंतर्गत व बर्हिगत आव्हाने असतात. त्यांच्यापासून राष्ट्र रक्षणासाठीचे उपाय योजले जातात म्हणून राष्ट्रीय सुरक्षेमध्ये राष्ट्रावरील बाह्य आक्रमणाबरोबरच देशांतर्गत शत्रूंपासून देशाचे रक्षण ही कल्पनाही महत्त्वाची आहे. बहिर्गत आक्रमण ही दररोज घडणारी घटना नाही तरी शांतताकाळात राष्ट्ररक्षणासाठी केलेली तयारी किंवा केलेले उपाय यांचा राष्ट्रीय सुरक्षेशी संबंध आहे. म्हणून शांतताकाळात जागरूक राहून राष्ट्राच्या संरक्षणासाठी निर्माण केलेल्या संरक्षण व्यवस्थेला राष्ट्रीय सुरक्षा असे म्हणतात.

राष्ट्रीय सुरक्षेमध्ये मूलभूत मूल्यांच्या रक्षणासाठी राष्ट्रीय सामर्थ्याचा उपयोग केला जातो. त्याचबरोबर देशांतर्गत सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय सुरक्षेसाठी इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात.

## उपक्रम

१. अलेक्झांडरने भारतावर केलेल्या आक्रमणाच्या संदर्भात वाचन करा. अलेक्झांडरला भारतातील कोणत्या राजांनी मदत केली? अलेक्झांडर व पोरस यांच्यात झालेल्या झेलमच्या लढाईचे वाचन करा. पोरस राजाने दाखवलेला स्वाभिमान, पराक्रम याचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

२. अलेक्झांडर व राजा पुरू (पोरस) यांच्यात झालेला संवाद शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार करा व त्याचे नाट्यीकरण सादर करा.

३. सम्राट अशोकाच्या काळातील भारताच्या नकाशाचे अवलोकन करा. प्राचीन भारत (राजकीय) आराखड्यात सम्राट अशोकाच्या साम्राज्य विस्ताराची सीमा/ठिकाणे/स्थळे दर्शवा. (संदर्भासाठी-इतिहास व नागरिकशास्त्र पाठ्यपुस्तक इयत्ता ६ वी पाहावे.)

४. खालील मुद्द्यांवर चर्चा करा -

अ) परकीय आक्रमणास सामोरे जाण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व.

ब) राष्ट्रीय एकात्मतेसाठीच्या भारतीय संविधानातील तरतुदी.

वरीलपैकी एका घटकाबद्दल चर्चा करून त्याचे मुद्दे लिहा.

५. भारतातील नैसर्गिक साधनसंपत्तीचे राष्ट्रशक्तीचा घटक म्हणून असलेले महत्व यावर टीप लिहा.

६. भारताचा विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील विकास यावर चर्चा करा. चर्चेत आलेले मुद्दे येथे लिहा.

७. भारताच्या आण्विक आणि अवकाश क्षेत्रातील कामगिरीची गटचर्चा करा आणि गटचर्चेतील महत्वाच्या बाबी लिहा.

# प्रकरण २ राष्ट्रीय सुरक्षा आव्हाने (बाह्य)

सोबतच्या भारताच्या नकाशाचे निरीक्षण करा.

भारताच्या शेजारील देश कोणते ते अभ्यासा. त्यांच्याशी असलेले भारताचे संबंध, पूर्व इतिहास आणि आज भारतासमोरील आव्हानांचा आपण विचार करणे गरजेचे आहे. भारताच्या पश्चिमेस पाकिस्तान आणि उत्तरेस चीन हे शेजारी देश आहेत. उत्तरेस भारताची सीमा अफगाणिस्तानलाही भिडली आहे. अफगाणिस्तानला भिडलेल्या या भारतीय सीमा भागास 'वाकन कॉरिडॉर' असेही म्हणतात.

या व्यतिरिक्त भारताच्या उत्तरेस, नेपाळ, भूतान हे देश असून पूर्वेस बांग्लादेश व म्यानमारचा प्रदेश आहे. दक्षिणेस हिंदी महासागर क्षेत्रात श्रीलंका आहे.

## भारत व शेजारी देश



## ❍ पाकिस्तान :

भारत आणि पाकिस्तान यांच्यात १९४७ पासून अनेक युद्धे झालेली आहेत. पाकिस्तान सोबत १९४७-४८, १९६५ आणि १९७१ या प्रमुख युद्धांचा समावेश असून त्यापैकी पहिली दोन युद्धे मुख्यतः काश्मीर समस्येवरून झाली आहेत. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धातून बांग्लादेशाची स्वतंत्र राष्ट्र म्हणून निर्मिती झाली. त्यापूर्वी तो पूर्व पाकिस्तान म्हणून भारताच्या पूर्वेकडील पाकिस्तानचा प्रदेश होता. १९९९ मध्ये भारताला पुन्हा कारगिल भागात लढाई करावी लागली. पाकिस्तानसोबतची आजपर्यंतची युद्धे पारंपरिक स्वरूपाची म्हणून मर्यादित होती. भविष्यकालीन युद्धे कदाचित अण्वस्त्रांसह म्हणूनच व्यापक स्वरूपाची असू शकतील. म्हणजेच पाकिस्तानसोबतच्या युद्धांचे स्वरूप बदलते आहे.

अनेक दहशतवादी गटांनी पाकिस्तानमध्ये आश्रय घेतला आहे. भारतावर या दहशतवादी गटांचे हल्ले होत असतात. हे एक आव्हान आहे.

## ❍ चीन :

भारताच्या उत्तरेस चीन ही एक महत्वाची (राष्ट्र) सत्ता आहे. आंतरराष्ट्रीय सीमावाद व तिबेटचे स्थान हे भारत-चीन विवादाचे मूळ कारण आहे. अक्साई चीन आणि अरुणाचल प्रदेशाची(पूर्वीचा नेफा) उत्तर सीमा निश्चितीबाबत दोन विवाद क्षेत्रे या दोन्ही देशा-दरम्यानची आहेत. अरुणाचल प्रदेश 'नेफा' म्हणून ओळखला जात होता. उत्तरेकडील अक्साई चीन या लडाख मधील भारतीय प्रदेशावर चीनचा अवैध ताबा आहे. अरुणाचल प्रदेश व तिबेटदरम्यानची सीमा मॅकमहॉन रेषा म्हणून ओळखली जाते. १९१४ मध्ये शिमला येथे भारत, चीन व तिबेटी प्रतिनिधींच्या उपस्थितीत हेन्री मॅकमहॉन या ब्रिटिश अधिकाऱ्याने ही सीमारेषा भारत-चीन दरम्यानची आंतरराष्ट्रीय सीमा म्हणून निश्चित केली होती. १९६२ च्या भारत-चीन युद्धाचे मूळ कारण हा सीमावाद हेच होते.

पारंपरिकदृष्ट्या तिबेट हा स्वायत्त प्रदेश आहे. बौद्ध संस्कृती हे तिबेटचे वैशिष्ट्य आहे. १९५० पासून चीनने तिबेटवर आपला हक्क प्रस्थापित केला असून तेथील बौद्ध संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न चालवला आहे. तिबेटी जनतेवर चीनने चालवलेल्या अत्याचारांमुळे तिबेटचे प्रसिद्ध धार्मिक नेते दलाईलामां यांनी १९५८ मध्ये भारताचा आश्रय घेतला.

## ❍ बांग्लादेश :

१९७१ पूर्वी भारताच्या पश्चिमेस पश्चिम पाकिस्तान तर पूर्वेस पूर्व पाकिस्तान असे दोन पाकिस्तानी प्रदेश भारताच्या दोन बाजूंना होते. पूर्व पाकिस्तानात प्रचंड शोषण व मानवी हक्कांचे उल्लंघन पश्चिम पाकिस्तानने चालवले होते. यातूनच शेख मुजिबुर रेहमान यांच्या नेतृत्वात पूर्व पाकिस्तानी लोकांनी पश्चिम पाकिस्तानच्या जुलमी लष्करी राजवटीविरुद्ध बंड पुकारले. पश्चिम पाकिस्तानच्या या शोषणापासून स्वतंत्र होण्यासाठी पूर्व पाकिस्तानने पुकारलेला हा लढा होता. या लढ्यामुळे लाखो पूर्व पाकिस्तानी भारतात निर्वासित म्हणून आश्रयासाठी आले. त्यामुळे भारताच्या

अंतर्गत व्यवस्थेवर मोठा ताण पडला म्हणूनच भारताने पूर्व पाकिस्तानच्या प्रयत्नांना सहकार्य केले. यातूनच १९७१ च्या युद्धाची सुरुवात झाली आणि बांग्लादेशाची स्वतंत्र राष्ट्र म्हणून निर्मिती झाली.

१९७१ पासून भारत व बांग्लादेश या दोन्ही देशांनी आपले परस्परसंबंध चांगले ठेवले. पुढे गंगा नदीवरील फराक्का येथील धरणावरून तंटा निर्माण झाला. फराक्का तंटा म्हणून तो आजही परिचित आहे. बांग्लादेशात वाहणाऱ्या गंगा नदीचे पाणी त्यामुळे अडवले गेले अशी भूमिका बांग्लादेशाची होती. १९७८ मध्ये हा वाद फराक्का करारावरील दोन्ही देशांच्या स्वाक्षरीनंतर संपुष्टात आला.

### ❍ श्रीलंका :

भारताचे श्रीलंकेशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. तमीळ अल्पसंख्याक समस्येमुळे श्रीलंकेच्या उत्तरीय प्रदेशात अंतर्गत अस्थिरता होती. राजकीय स्वातंत्र्याची मागणी तमीळ अल्पसंख्याक करत होते. या स्वातंत्र्याच्या मागणीचे रूपांतर नंतर लष्करी कारवाईत झाले. १९८७ मध्ये तमीळ समस्या निराकरणासाठी भारत-श्रीलंका दरम्यान करार झाला आणि त्यानुसार भारताने श्रीलंका सरकारला सहकार्याबाबत विश्वास दिला. या समस्येमुळे निर्माण झालेली परिस्थिती नियंत्रणात आणून सुरक्षितता निर्माण करण्यासाठी भारताने शांतीसेना पाठवून श्रीलंकेला सहकार्य केले. भारताच्या वरील शेजारी देशांबरोबरच हिंदी महासागराचे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्व लक्षात घेणे गरजेचे आहे.


## सागरी क्षेत्र

### ❍ हिंदी महासागर :

भारताला सुमारे ७००० किमी. चा समुद्र किनारा लाभला आहे. हिंदी महासागर हे क्षेत्र जागतिक व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. या व्यापाराचा मुख्य मार्ग सुएझ कालव्यापासून मलक्काच्या सामुद्रधुनीपर्यंत आहे. या मार्गामध्ये भारताचे मध्यवर्ती स्थान आहे. तसेच अंदमान-निकोबार द्वीप समूहांना यामुळे महत्त्व प्राप्त होते.

डच, फ्रेंच, पोतुर्गीज व ब्रिटिश हे व्यापारासाठी समुद्र मार्गाने भारतात आले व त्यांनी आपल्या वसाहती येथे स्थापन केल्या होत्या. हिंदी-महासागरात अमेरिका, रशिया व चीन व इतर देशांचा प्रभाव वाढत आहे. हे क्षेत्र नैसर्गिक साधन संपत्तीच्या दृष्टीने संपन्न आहे. यामुळे हिंदी महासागराची सुरक्षा हे भारतासमोरील एक महत्त्वाचे आव्हान आहे.

हिंदी महासागर नकाशा


भूमध्य समुद्र
आ शि या
इराणचे आखात
तांबडा समुद्र
भारत
अरबी समुद्र
एडनचे आखात
बंगालचा उपसागर
आ फ्रि का
श्रीलंका
मलाक्काची समुद्रधुनी
मालदिव
म ले शि या
इंडोनेशिया
मादागासकर
ऑ स्ट्रे लि या
हिं दी म हा सा ग र
कॅप ऑफ
गुड होप
उ.
० १०००
किमी.
हिं दी म हा सा ग र

## उपक्रम

भारत व शेजारील देशासंबंधी वर्तमानपत्रातून येणाऱ्या बातम्या, चित्रे यांचा संग्रह करा. येथे चिकटवा.

भारत व शेजारील देशासंबंधी वर्तमानपत्रातून येणाऱ्या बातम्या, चित्रे यांचा संग्रह करा. येथे चिकटवा.

# प्रकरण ३ भारतीय संरक्षण व्यवस्था



भारताच्या प्रत्येक भूभागाच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी भारत सरकारची आहे. राष्ट्रपती हे भारताच्या तीनही सेनादलांचे सर्वोच्च सेनापती आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळातील संरक्षण मंत्री हे संरक्षण मंत्रालयाचे प्रमुख असतात. प्रधानमंत्र्यांना सुरक्षाविषयक सल्ला देण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार असतात.

## संरक्षण मंत्रालय आणि त्यातील विभाग

स्वातंत्र्यानंतर संरक्षण मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली. संरक्षण मंत्रालयास मिळालेल्या संसाधनातून शासकीय धोरणांना दिशा देणे आणि मंजूर कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे हे प्रमुख कार्य या मंत्रालयाचे आहे. या मंत्रालयांतर्गत विविध विभाग पुढीलप्रमाणे आहेत.

- **संरक्षण विभाग :**

  सेनादलासंबधी कार्य, संरक्षण अंदाजपत्रक, संरक्षण धोरण, संसदेसंबंधित कामकाज, परदेशांशी संरक्षणासंबंधी सहकार्य इत्यादी विभाग संरक्षण विभागात आहेत.

- **संरक्षण उत्पादन विभाग :**

  हा विभाग मुख्यत: तीनही संरक्षण दलांना व विभागांना लागणाऱ्या विविध उत्पादनांशी संबंधित आहे. त्यात संरक्षण उत्पादन कारखाने, संरक्षण साहित्य, सार्वजनिक उत्पादन मंडळ, विविध साहित्य व त्यांचे सुटे भाग, संरक्षणासंबंधी आयात साहित्याचे स्वदेशीकरण (भारतीयकरण) इत्यादी विभागांचे नियोजन व नियंत्रणाचा समावेश आहे.

- **संरक्षण संशोधन आणि विकास विभाग :**

  विविध संरक्षण साहित्यासंबंधित व त्यांच्या उत्पादनासंबंधित वैज्ञानिक माहितीविषयक सल्ला भारत सरकारला देणे व संशोधन करणे हे या विभागाचे कार्य आहे.

- **निवृत्त सैनिक कल्याण विभाग :**

  तीनही सेनादलातील निवृत्त सैनिक, अधिकारी व इतरांचे निवृत्तीवेतन, कल्याण आणि पुनर्वसन इ. कार्य या विभागाद्वारे केले जाते.

- **सेनादल मुख्यालये आणि आंतरसेवा संघटना :**

  तीनही सेनादलांची मुख्यालये आणि विविध सेवांतर्गत संघटनांचे सहकार्य संरक्षण मंत्रालयास असते. तीनही सेनादल मुख्यालये उदा. स्थलसेना मुख्यालय, नौसेना मुख्यालय, वायुसेना मुख्यालय हे अनुक्रमे स्थलसेना प्रमुख, नौसेना प्रमुख आणि वायुसेना प्रमुख यांच्या नियंत्रणात कार्य करतात.

## ❍ सेनादले :

संरक्षण मंत्रालयांतर्गत मुख्यत: तीन सशस्त्र सेनादलांचा अंतर्भाव असतो, ते म्हणजे

- स्थलसेना
- नौसेना
- वायुसेना

बाह्य आक्रमणापासून देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणे हे प्राथमिक कार्य सेनादलांचे आहे. तसेच वेळोवेळी उद्‌भवणारे देशांतर्गत धोके किंवा नैसर्गिक आपत्ती, संप आणि अशांतता इ. काळात सरकारला सहकार्य करणे हे सुद्‌धा सेनादलांचे कार्य आहे.

## ❍ सेनादलातील विविध हुद्दे :

**RANKS IN ARMY NAVY AND AIR FORCE AND THEIR EQUIVALENT**

| Sr. No. | Army | Navy | Air Force | |
|---|---|---|---|---|
| 1 | Field Marshal<br>फील्ड मार्शल | Admiral of the Fleet<br>ॲडमिरल ऑफ द फ्लीट | Marshal of the Air Force<br>मार्शल ऑफ द एअर फोर्स | |
| 2 | General<br>जनरल | Admiral<br>ॲडमिरल | Air Chief Marshal<br>एअर चीफ मार्शल | Chiefs of Army, Navy and Air Staff<br>स्थल सेना, नौसेना व वायुसेना प्रमुख |
| 3 | Lieutenant General<br>लेफ्टनंट जनरल | Vice Admiral<br>व्हाईस ॲडमिरल | Air Marshal<br>एअर मार्शल | |
| 4 | Major General<br>मेजर जनरल | Rear Admiral<br>रिअर ॲडमिरल | Air Vice Marshal<br>एअर व्हाईस मार्शल | |
| 5 | Brigadier<br>ब्रिगेडिअर | Commodore<br>कोमोडोर | Air Commodore<br>एअर कोमोडोर | |
| 6 | Colonel<br>कर्नल | Captain<br>कॅप्टन | Group Captain<br>ग्रुप कॅप्टन | |
| 7 | Lieutenant Colonel<br>लेफ्टनंट कर्नल | Commander<br>कमांडर | Wing Commander<br>विंग कमांडर | |
| 8 | Major<br>मेजर | Lieutenant Commander<br>लेफ्टनंट कमांडर | Squadron Leader<br>स्क्वाड्रन लीडर | |
| 9 | Captain<br>कॅप्टन | Lieutenant<br>लेफ्टनंट | Flight Lieutenant<br>फ्लाईट लेफ्टनंट | |
| 10 | Lieutenant<br>लेफ्टनंट | Sub Lieutenant<br>सब लेफ्टनंट | Flying Officer<br>फ्लाईंग ऑफिसर | |

# INDIAN ARMY RANK INSIGNIA: OFFICERS


General


Lieutenant General


Major General


Brigadier


Colonel


Lieutenant Colonel


Major


Captain


Lieutenant

# INDIAN ARMY RANK INSIGNIA: JCO/NCO/JAWANS


Subedar Major


Subedar


Naib Subedar


Regimental Havildar Major


Regimental Quarter Master Havildar


Company Havildar Major


Company Quarter Master Havildar


Havildar


Naik


Lance Naik


# INDIAN AIRFORCE RANKS



Shoulder
Sleeve
Rank

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Marshal of the Airforce | Air Chief Marshal | Air Marshal | Air Vice Marshal | Air Commodore |
| Group Captain | Wing Commander | Squadron Leader | Flight Lieutenant | Flying Officer |

# INDIAN NAVY RANKS



Shoulder
Sleeve
Rank

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Admiral Of the Fleet | Admiral | Vice Admiral | Rear Admiral | Commodore |
| Captain | Commander | Lieutenant Commander | Lieutenant | Sublieutenant |

## ❍ निमलष्करी सेनादले :

लष्करी सेनादलांच्या तुलनेत निमप्रशिक्षित, मर्यादित सुरक्षा कार्य करणारी सेनादले म्हणजे निमलष्करी सेनादले होय. त्यांची संघटनात्मक रचना, युद्धनीती, प्रशिक्षण, सहसंस्कृती आणि कार्य हे नियमित लष्करासारखेच असते पण ते देशाच्या नियमित सेनादलांचा भाग नसतात. उदा. राष्ट्रीय रायफल्स, आसाम रायफल्स इत्यादी.

## उपक्रम

१. निवृत्त लष्करी अधिकारी किंवा सैनिकाचा भारतीय सैन्याबाबत व त्यांच्या अनुभवाबाबत खालील मुद्द्यांच्याआधारे मुलाखत घ्या. मुलाखतीसाठी मुद्दे :

(अ) लष्करी अधिकाऱ्याचे किंवा सैनिकाचे नाव/हुद्दा

..................................................................................................

..................................................................................................

(ब) शिक्षण-प्रशिक्षण

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

(क) सेनादलातील कालावधी

..................................................................................................

..................................................................................................

(ड) सेनादलातील जबाबदारी

..................................................................................................

..................................................................................................

(इ) विशेष अनुभव

..................................................................................................

..................................................................................................

(ई) तरुणांसाठी संदेश

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

२. सशस्त्र सेनादलाच्या संकेत स्थळांना भेट द्या. तुमच्या आवडीच्या एका सेनादलाबद्दल अधिक माहिती संकलित करून लिहा.

३. कोणत्याही एका शौर्यपदक विजेत्यांची माहिती संकेतस्थळावरून घेऊन लिहा.

# प्रकरण ४ भारतीय स्थलसेना

भारतीय स्थलसेना हा तीनही सेनादलात सर्वाधिक प्राचीन सेनाविभाग आहे. आर्य, चाणक्य आणि सम्राट चंद्रगुप्त मौर्याच्या काळापासून म्हणजे दोन हजार वर्षांचा अत्यंत प्राचीन व उच्चतम वारसा भारतीय स्थलसेनेचा आहे. सध्याच्या भारतीय स्थलसेनेचा पाया इंग्रजांच्या काळात घातला गेला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात नेताजी सुभाषचंद्रबोस यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आझाद हिंद सेना स्थापन केली होती. तसेच महिलांना पण त्यांनी आपल्या सैन्यात सहभागी करून घेतले होते. कॅप्टन लक्ष्मी सहगल या महिला तुकडीच्या प्रमुख होत्या.




## भारतीय स्थलसेनेची भूमिका


परकीय आक्रमणापासून आणि अंतर्गत कलहापासून राष्ट्रहित जोपासणे ही स्थलसेनेची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. ही भूमिका यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पुढील कार्यवाहीसाठी स्थलसेनेला तत्पर रहावे लागते.

- परकीय आक्रमण मोडून काढण्यासाठी युद्ध करणे आणि नेहमी दक्ष राहणे.
- देशात निर्माण झालेले अंतर्गत धोके मोडून काढण्यासाठी अंतर्गत सुरक्षा व्यवस्थापन सक्षम करणे.
- राष्ट्रहित जोपासण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे लागेल तेव्हा लष्करी बळाचा वापर करणे.
- मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या परकीय देशांना तसेच युनोच्या शांततापूर्ण कारवायांमध्ये सहकार्य करणे.
- मानवी आणि नैसर्गिक आपत्तीकाळात सहकार्य करणे तसेच नागरी अधिकाऱ्यांना मदत देणे इत्यादी.



## सेनेतील भौगोलिक विभाग आणि नियंत्रण

देशाचा भौगोलिक आकार व विस्तार आणि सुरक्षेच्या संभाव्य धोक्यांच्या आधारे भारतीय सैन्याची सहा कार्यात्मक विभागात (कमांड) विभागणी केली आहे. हे विभाग देशात विखुरले आहेत. या विभागाची २ ते ३ सेनाभागात (कोअर) विभागणी असते. या सेनाभागांची पुन्हा आणखी २ ते ३ सैनिकी डिव्हीजन मध्ये रचना केलेली असते. या सैनिकी डिव्हीजनची विभागणी ४ ते ५ ब्रिगेडमध्ये केली जाते. प्रत्येक बिग्रेडमध्ये ३ ते ४ बटालियन्स किंवा रेजिमेंटस् असतात. बटालियनची विभागणी पुन्हा कंपनी, प्लाटून्स् आणि सेक्शन्समध्ये होते आणि एका सेक्शनमध्ये १० सैनिक असून हा सैन्याचा सर्वात लहान व स्वयंपूर्ण लढाऊ गट असतो.



## भारतीय सैन्याचे कार्यात्मक विभाग :

### १) उत्तर विभाग (नॉर्दन कमांड):

उधमपूर येथे या विभागाचे मुख्यालय आहे. पूर्वेकडे चीन तर पश्चिमेकडे पाकिस्तान या राष्ट्रांपासून सुरक्षा ही उत्तर विभागाची प्रमुख जबाबदारी आहे. जम्मू-काश्मीरचा प्रदेश या विभागाचे कार्यक्षेत्र आहे.

### २) पश्चिम विभाग (वेस्टर्न कमांड):

चंदिगड येथे या विभागाचे मुख्यालय असून पंजाब, पूर्वेकडे हिमाचल प्रदेश हे याचे कार्यक्षेत्र आहे. पश्चिमेकडे पाकिस्तान तर पूर्वेकडे चीनपासून सुरक्षा हे यांचे कार्य आहे.

### ३) दक्षिण-पश्चिम विभाग (साऊथ वेस्टर्न कमांड):

जयपूर येथे या विभागाचे मुख्यालय आहे. उत्तर आणि मध्य राजस्थान व हरियाणा या विभागाचे कार्यक्षेत्र आहे.

### ४) दक्षिण-विभाग (सदर्न कमांड):

पुणे येथे या विभागाचे मुख्यालय आहे. दक्षिण राजस्थान आणि गुजरात तसेच महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू, तेलंगणा व आंध्र प्रदेश हे दक्षिण विभागाचे कार्यक्षेत्र आहे.

### ५) मध्य विभाग (सेंट्रल कमांड):

लखनौ येथे या विभागाचे मुख्यालय आहे. उत्तराखंड, उत्तरप्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, ओरिसा, झारखंड व छत्तीसगड हे या विभागाचे कार्यक्षेत्र आहे. उत्तराखंडमध्ये चीन तर उत्तरप्रदेश व बिहारमध्ये भारत-नेपाळ सीमेची सुरक्षा ही मध्य विभागाची जबाबदारी आहे.

### ६) पूर्व विभाग (ईस्टर्न कमांड):

कोलकाता येथे या विभागाचे मुख्यालय आहे. सिक्कीम, भूतान, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा आणि मिझोराम या क्षेत्राची सुरक्षा ही पूर्व विभागाची जबाबदारी आहे. तसेच भारत-नेपाळ सीमा, म्यानमार आणि बांग्लादेश सरहद्दींची जबाबदारीही याच विभागाची आहे.

### (७) प्रशिक्षण विभाग :

भारतीय सैन्याच्या सहा कार्यात्मक विभागांव्यतिरिक्त एक स्वतंत्र प्रशिक्षण विभाग असून स्थलसेनेचे प्रशिक्षण ही त्यांची मुख्य जबाबदारी आहे.

## स्थलसेनेची संघटना आणि रचना

प्रामुख्याने लढाऊ विभाग आणि पूरक सेवा विभाग अशा दोन प्रकारात स्थलसेनेच्या विविध विभागांची संघटनात्मक विभागणी असते.

### अ) लढाऊ आणि लढाऊपूरक गट :

यात रणांगणावर शत्रूंशी प्रत्यक्ष लढणाऱ्या लष्करी गटांचा समावेश होतो. ते पुढीलप्रमाणे –



चिलखती दल



तोफखाना



अभियांत्रिकी गट



पायदळ



संपर्क गट



स्थलसेनेचा हवाई संरक्षक गट




स्थलसेना हवाई गट



स्थलसेनेचा शत्रूविषयक ज्ञान विभाग

## अ) पूरकसेवा गट :



स्थलसेना पुरवठा विभाग (ASC)
अन्नधान्य, दळणवळण व पेट्रोलियम पदार्थ



स्थलसेना युद्धसामुग्री विभाग (AOC)
दारूगोळा, शस्त्रास्त्रे, वाहतूक साधने, कापड व इतर साहित्य



इलेक्ट्रॉनिक्स् आणि तंत्र अभियांत्रिकी विभाग (EME)
शस्त्रास्त्र आणि साहित्य दुरुस्ती व देखभाल




वैद्यकीय सेवा व उपचार (AMC)
स्थलसेनेचा वैद्यकीय विभाग




दंतचिकित्सा व उपचार (ADC)
स्थलसेनेचा दंतचिकित्सा विभाग



मनुष्यबळ विकास (AEC)
स्थलसेनेचा शैक्षणिक विभाग




पशुवैद्यकीय विभाग (RVC)
घोडे, श्वान पथक, खेचरे इत्यादी




लष्करी पोलीस (MP)
वाहतूक नियंत्रण व शिस्त




कायदा विभाग (JAG)



पायोनिअर (PIONEER)
युद्धक्षेत्रात आघाडी व पिछाडीवर कार्यरत लष्करी कामगार

## उपक्रम

१. स्थलसेनेतील लढाऊ गटांच्या योग्य जोड्या लावा. (छायाचित्राआधारे)

| | | |
|---|---|---|
| पायदळ | ◯ | A  |
| तोफखाना | ◯ | B  |
| अभियांत्रिकी विभाग | ◯ | C  |
| स्थलसेना हवाई संरक्षक गट | ◯ | D  |
| चिलखती दल | ◯ | E  |
| संपर्क विभाग | ◯ | F  |

२. स्थलसेना रचनात्मक आराखडा (Ranks) तक्ता तयार करून वर्गात दर्शनी भागात लावा.

# प्रकरण ५ भारतीय नौसेना




भारतात इ. स. पूर्व २३०० मध्ये हडप्पा संस्कृतीच्या काळात पहिली गोदी तयार करण्यात आली असे दिसते. ती गुजरात राज्याच्या मंगरोळ बंदराजवळ होती. इ.स.च्या ५ व्या व १० व्या शतकात चोल आणि कलिंगच्या राजांनी आपल्या नौदलाचा विकास करून त्याच्या साहाय्याने मलाया, सुमात्रा आणि पश्चिम जावा (इंडोनेशिया) पर्यंत आपल्या साम्राज्याच्या सीमा वाढवल्या. याच काळात भारतीय उपमहाद्वीपमधून या साम्राज्याशी व चीनशी व्यापार करण्यासाठी मध्यवर्ती केंद्र म्हणून अंदमान व निकोबार बेटांना महत्त्व होते.

१७ व्या शतकाच्या अखेरीस भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर जंजिऱ्याचा सिद्दी आणि मोगल यांच्यात झालेल्या हातमिळवणीमुळे भारताच्या सागरी हिताला धोका निर्माण झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले सागरी हित जोपासण्यासाठी सिद्दोजी गुजर व नंतर कान्होजी आंग्रे या दोन आरमार प्रमुखांच्या नेतृत्वाखाली आपल्या आरमाराची उभारणी केली होती. कान्होजी आंग्रे यांनी संपूर्ण कोकण किनाऱ्यावर आपली सत्ता निर्माण करून मराठा आरमार शक्तिशाली बनवले होते. इंग्रज, पोर्तुगीज व डच यांच्याशी त्यांनी यशस्वीपणे झुंजही दिली होती.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय नौसेनेची वाढ झपाट्याने सुरू झाली. आरमाराची उभारणी, त्यात नवनवीन जहाजांचा समावेश करून त्याचे आधुनिकीकरण करणे सुरू आहे. भारतीय नौदलात सध्या विमानवाहू जहाजांपासून पाणबुड्यांपर्यंतच्या सर्व प्रकारच्या लढाऊ जहाजांचा समावेश करण्यात आला आहे.





## भारतीय नौसेनेचे कार्य

- **लष्करी कार्य :** नौदलाचे दोन प्रकारचे लष्करी कार्य आहे.

  **अ) आक्रमणाच्या वेळेचे कार्य :** नाविक मोहिमेत आक्रमण करतेवेळी शत्रू सैनिक, शत्रू प्रदेश व त्यांचा व्यापार उध्वस्त करणे.

  **ब) बचावाच्या वेळेचे कार्य :** नाविक मोहिमेत शत्रूच्या नाविक आक्रमणापासून आपले सैनिक, आपला प्रदेश व व्यापार यांचे रक्षण करणे.

- **राजनैतिक कार्य :** भारताची राष्ट्रीय सुरक्षा आणि राष्ट्रहिताची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी किंवा ती जोपासण्यासाठी सागरी वातावरणाची योग्य पद्धतीने निर्मिती करण्याचे कार्य करणे.

- **सागरी कायद्यासंबंधीचे कार्य :** भारतीय सागरी सीमा व सागरी प्रदेश यांचे रक्षण करणे, हे भारतीय नौदलाचे प्रमुख कार्य आहे. त्याशिवाय सागरी तस्करांचा, चाच्यांचा आणि दहशतवाद्यांचा बंदोबस्त करणे. त्याकरिता भारतीय नौदल, तट रक्षक दल, राज्य सागरी पोलीस आणि बंदर प्राधिकरण यांची मदत होते. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर सागर किनाऱ्याच्या सुरक्षेची संपूर्ण जबाबदारी नौदलाकडे सोपवण्यात आली आहे.

- **नियंत्रण आणि प्रभुत्व :** भारतीय नौसेनेचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे आहे. नौसेनेचे संपूर्ण नियंत्रण नौसेनाध्यक्ष **(Chief of Naval Staff)** यांचेकडे असते.

## नाविक विभाग (कमांड्स) :

भारतीय नौसेनेचे खालील कमांड्स आहेत. ते त्यांच्या मुख्य कार्यालयातून नेमून दिलेल्या भौगोलिक क्षेत्रातील कार्ये व जबाबदाऱ्या पूर्ण करत असतात. ते कमांड्स पुढीलप्रमाणे –

**अ) पश्चिम नाविक कमांड :** भारताच्या पश्चिमेकडील समुद्र किनाऱ्यावरील गुजरात, महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक राज्यातील बंदरे, नाविक तळ आणि नाविक केंद्रे व त्यावरील जहाजे यांच्या संरक्षणाची जबाबदारी या कमांडची आहे. या कमांडचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे.

**ब) पूर्व नाविक कमांड :** भारताच्या पूर्वेकडील समुद्र किनाऱ्यावरील बंगाल, ओरिसा, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू राज्यातील बंदरे, नाविक तळ आणि नाविक केंद्रे व त्यावरील जहाजांच्या संरक्षणाची जबाबदारी या कमांडची आहे. या कमांडचे मुख्य कार्यालय विशाखापट्टणम येथे आहे.

**क) दक्षिण नाविक कमांड :** भारताच्या दक्षिणेकडील केरळ आणि लक्षद्विप बेटे यातील बंदरे, नाविक तळ व नाविक केंद्रे येथील जहाजे व लढाऊ जहाजे यांचे संरक्षण करणे या कमांडची जबाबदारी आहे. या नाविक कमांडचे मुख्य कार्यालय कोची येथे आहे.

**ड) अंदमान आणि निकोबार संयुक्त विभाग (कमांड):** अंदमान व निकोबार द्वीपसमूहाच्या रक्षणाची जबाबदारी या कमांडची आहे. या कमांडमध्ये स्थलसेना, वायुसेना व नौसेनेच्या सैनिकांची संख्या मोठी आहे म्हणून या कमांडला संयुक्त कमांड असेही म्हणतात. या कमांडचे अधिपत्य तिन्ही सेनादलाचे अधिकारी क्रमाक्रमाने सांभाळतात. या कमांडचे मुख्य कार्यालय पोर्टब्लेअर येथे आहे.

## भारतीय नौसेनेतील जहाजांचे प्रकार

**विमानवाहू जहाज :** विमानवाहू जहाज हे आकाराने व वजनाने मोठे लढाऊ जहाज आहे. या जहाजावर विमानांना उड्डाण करण्याची व विमानांना उतरवण्यासाठीच्या सुविधा असतात. तसेच या जहाजावर विमाने असतात म्हणून त्या जहाजाला 'तरंगता हवाईतळ' असे म्हणतात. विमानवाहू जहाज हे गतिमान युद्धातील एक प्रभावी साधन आहे.





**विनाशिका :** विनाशिका हे जहाज अवजड व लांब पल्ल्याच्या विविध शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेले लढाऊ जहाज आहे. या जहाजांचा आकार हा नाविक दलातील (आरमारातील) विमानवाहू जहाजापेक्षा लहान असतो. त्यावर विमान विरोधी तोफा, लघु पल्ल्याची शस्त्रास्त्रे, शत्रूच्या जहाजावर व जमिनीवर मारा करणारी क्षेपणास्त्रे विमानांच्या किंवा शत्रूच्या क्षेपणास्त्रांच्या विरोधात मारा करणारी मार्गदर्शक क्षेपणास्त्रे, पाणबुडी विरोधात वापरली जाणारी क्षेपणास्त्रे, (टॉरपेडो व डेप्थचार्ज) ही शस्त्रास्त्रे असतात. त्याचबरोबर आपल्या सैनिकांना शत्रूच्या सागर किनाऱ्यावर उतरतेवेळी सुरक्षा व विमानवाहू जहाजास सुरक्षा देण्याचे कार्य विनाशिका करते.

**फ्रिगेट :** फ्रिगेट हे लढाऊ जहाज विनाशिकेपेक्षा आकाराने लहान असते. या जहाजावरही मार्गदर्शक क्षेपणास्त्रे असतात. जहाजावरील इतर शस्त्रास्त्रे व क्षेपणास्त्रांचा उपयोग युद्धाच्या वेळी शत्रूच्या समुद्रकिनाऱ्यावर आणि जहाजांवर मारा करण्यासाठी करतात.





**कॉर्वेट्स :** हे वेगवान व हलक्या शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेले फ्रिगेटपेक्षा लहान व किनाऱ्यावर गस्त घालणाऱ्या बोटीपेक्षा मोठे जहाज असते. या जहाजाचा उपयोग पाणबुडी विरोधीच्या लढाईत प्रामुख्याने केला जातो.



**माईन स्वीपर :** या जहाजाला पाणसुरूंग विरोधी जहाज म्हणूनही ओळखले जाते. हे लहान जहाज असून शत्रूने समुद्रात पेरून ठेवलेले पाणसुरूंग काढण्याची किंवा त्या पाणसुरूंगांना निकामी करण्यासाठीची यंत्रे यावर असतात.

**लॅन्डींग शिप :** ज्या समुद्र किनाऱ्यावर, बंदरासारख्या सोई सुविधा नसतात, त्याठिकाणी या मोठ्या आकाराच्या जहाजातून वाहने, विविध साहित्य आणि सैनिक यांना वाहून नेऊन समुद्र किनाऱ्यावर उतरवण्याचे कार्य या जहाजाचे असते.





**पॅट्रोल बोट (गस्ती बोट) :** हे नौसेनेतील सर्वात लहान जहाज आहे. त्याचे प्रमुख काम हे समुद्रकिनाऱ्यालगतच्या भागात टेहाळणी करण्याचे असते.

**पाणबुडी :** पाणबुडी शत्रुसेनेत सर्वात मोठी भीती निर्माण करणारे अस्त्र आहे. पाणबुडीचा संचार पाण्याखालून असतो. पाणबुडीचे कार्य स्वतंत्रपणे चालते. शत्रूच्या जहाजांचा शोध घेणे व त्याला टॉरपेडो किंवा क्षेपणास्त्राच्या साहाय्याने उध्वस्त करणे हे प्रमुख काम पाणबुडीचे आहे





**साह्यकारी जहाज :** सागरी मोहिमेत लढाऊ जहाजांना सर्व प्रकारची आवश्यकतेनुसार मदत सामग्री पुरवण्याचे कार्य ही सहायक जहाजे करत असतात. त्यानुसार त्या जहाजाचा आराखडा बनवण्यात आलेला असतो.

**संशोधन जहाज :** या जहाजांचा उपयोग सागरतळाचे व सागरी मार्गाचे संशोधन करून आपल्या जहाजांची बांधणी व त्यावरील उपकरणे वापरण्यासाठीच्या सूचना देण्याचे कार्य करते.





**प्रशिक्षण जहाज :** नौसेनेतील अधिकारी व नौसैनिकांना सागरी युद्धाचे प्रशिक्षण देण्यासाठी या जहाजाचा उपयोग केला जातो.

या सोबतच नौदलाकडे जमिनीवरून काम करणारी लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर व गस्त विमाने असतात.

## उपक्रम

१. भारतीय नौदलाच्या संदर्भात अंदमान आणि निकोबार बेटे आणि लक्षद्विप बेटांचे महत्त्व कोणते? चर्चा करून त्याचे मुद्दे लिहा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२)	कान्होजी आंग्रे यांचे मराठ्यांचे आरमार विकसित करण्यातील योगदान कोणते? याची माहिती घ्या.

# प्रकरण ६ भारतीय वायुसेना

ब्रिटीश काळात 'रॉयल इंडियन एअर फोर्सची' स्थापना १९३२ मध्ये झाली. १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर रॉयल इंडियन एअर फोर्सचे नाव 'भारतीय वायुसेना' असे करण्यात आले.

## भारतीय वायुसेनेची संघटना

भारतीय वायुसेनेचे एकूण सात विभाग (कमांड्स) आहेत. त्यांतील पाच (operations) कमांड्स निकडीच्या कामावर आधारित (functional) कमांड्स आहेत. एक देखभाल दुरुस्ती (मेंटनन्स कमांड) आणि एक प्रशिक्षण विभाग (ट्रेनिंग कमांड) आहे. ती पुढीलप्रमाणे...

| अ.क्र. | कमांड्स | मुख्य कार्यालय | |
|---|---|---|---|
| (१) | सेंट्रल एअर कमांड | अलाहाबाद | |
| (२) | इस्टर्न एअर कमांड | शिलाँग | |
| (३) | वेस्टर्न एअर कमांड | नवी दिल्ली | निकडीच्या कामावर आधारित |
| (४) | साऊथ वेस्टर्न एअर कमांड | गांधीनगर | |
| (५) | सदर्न एअर कमांड | तिरुअनंतपुरम | |
| (६) | मेंटनन्स एअर कमांड | नागपूर | देखभाल दुरुस्तीसाठी |
| (७) | ट्रेनिंग एअर कमांड | बंगलोर | प्रशिक्षण विभागासाठी |

## वायुसेनेचे कार्य :

- भारतीय हवाई हद्दीचे संरक्षण करणे.
- स्थलसेना व नौसेनेला युध्दात मदत करणे.
- आवश्यकतेनुसार भारताच्या सीमेपलीकडे जाऊन आपल्या राष्ट्रहिताचे रक्षण करणे.
- आपत्ती काळात बचाव कार्यात सहकार्य करणे इत्यादी.

## भारतीय वायुसेनेतील विमाने



**एस यु ३० MKI (सुकोई ३०) :** हे बहुकर्मी लढाऊ विमान आहे. सुकोई ३० विमानात दोन इंजिने व दोन पायलट असतात. हे विमान रशियन बनावटीचे असून त्याचे भारतात उत्पादन केले जाते.

**मिराज २००० (वज्र) :** हे विमान फ्रेंच बनावटीचे विमान असून हवाई संरक्षण व शत्रूच्या विमानांशी झुंज देणारे लढाऊ विमान आहे. या विमानात एक इंजिन व एक पायलट असतो.






**मिग २९ :** हे विमान रशियन बनावटीचे असून हवाई वर्चस्व निर्माण करणारे लढाऊ विमान आहे. या विमानात दोन इंजिने व एक पायलट असतो.

**मिग २७ :** हे विमान रशियन बनावटीचे असून युद्धकलात्मक आघात (Tactical Strike) करणारे विमान आहे. या विमानात एक इंजिन व एक पायलट असतो.





**मिग २१ :** हे रशियन बनावटीचे विमान आहे. ते जमिनीवर आघात करणारे तसेच शत्रूच्या विमान विरोधात लढणारे बहुकर्मी लढाऊ विमान आहे. या विमानात एक इंजिन व एक पायलट असतो.



**जाग्वार :** हे अँग्लो फ्रेंच बनावटीचे असून शत्रू प्रदेशात खोलवर जाऊन मारा करणारे विमान आहे. या विमानात एक पायलट आणि दोन इंजिने असतात.

**सी १३० जे :** हे विमान रणांगणावर अत्यंत कमी लांबीच्या आणि कच्च्या धावपट्टीवर उतरणारे, हवाई छत्रीधारी, अवजड साहित्य, जखमींची ने-आण करण्यासाठी सक्षम आहे.





**सी १७ :** या विमानाची एका टप्प्यात ४२०० ते ९००० कि.मी. अंतरापर्यंत ४० ते ७० टन वजन वाहून नेण्याची क्षमता आहे.



**IL 76 :** हे रशियन बनावटीचे अवजड वाहतुकीचे लष्करी विमान आहे. या विमानात चार इंजिने असतात.

**AN 32 :** हे रशियन बनावटीचे मध्यम आकाराचे वाहतुकीचे विमान असून त्याला दोन टर्बो इंजिने असतात.






**MI25/MI35 :** हे दोन टर्बोशाफ्ट इंजिने असलेले हल्ला करणारे चिलखती गाड्या/रणगाडा विरोधी हेलिकॉप्टर आहे.

**MI26 :** हे रशियन बनावटीचे दोन टर्बोशाफ्ट इंजिन असलेले अवजड वाहतुकीचे हेलिकॉप्टर आहे.






**MI17-V5 :** या हेलिकॉप्टरवर हवाई वाहतुकीसाठीची इलेक्ट्रॉनिक उपकरणे, हवामानविषयक रडार ही उपकरणे असतात. तसेच रात्रीच्या वेळी कार्यवाही करताना आणि टेहळणी दरम्यान हेलिकॉप्टरच्या पायलटला रात्रीच्या वेळी रणांगणावरील दृश्ये पाहण्यासाठीचे गॉगल्स दिलेले असतात.




**चिताह :** हे फ्रेंच बनावटीचे एक टर्बोशाफ्ट इंजिन असलेले हेलिकॉप्टर आहे. या हेलिकॉफ्टरचे मुख्य कार्य टेहळणी करणे व जखमींची ने-आण करणे आहे.




**धृव :** हे भारतीय बनावटीचे वाहतुकीचे हेलिकॉप्टर आहे. हे हेलिकॉप्टर पर्वतीय क्षेत्रात ६ हजार मीटर उंचीवर सक्षमपणे कार्य करू शकते.

**चेतक :** हे एक इंजिन असलेले हलके फ्रेंच बनावटीचे टेहळणी हेलिकॉप्टर आहे.






**तेजस :** हे भारतीय बनावटीचे स्वदेशी हलके लढाऊ विमान आहे. भारतीय वायुसेनेत तेजस विमान इ. स. २०१६ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.




**रुद्र :** हे भारतीय बनावटीचे हलके लढाऊ हेलिकॉप्टर पर्वतीय क्षेत्रात कार्य करू शकते.

याबरोबरच भारतीय वायुसेनेकडे विविध प्रकारची क्षेपणास्त्रे आहेत.

## उपक्रम

१. भारतीय वायुसेनेच्या युद्धकार्याची माहिती वर्तमानपत्रे, मासिके व इंटरनेटच्या माध्यमातून संकलित करा.

२. दुष्काळ, भूकंप व महापूर इत्यादींसारख्या नैसर्गिक आपत्तींमधील भारतीय वायूसेनेच्या कामाची माहिती वर्तमान पत्रे, मासिके व इंटरनेटच्या माध्यमातून संकलित करा.

(३)भारतीय वायुसेनेकडे असलेल्या क्षेपणास्त्रांची चित्रे जमा करा व माहिती संकलित करा. चिकटवहीत चिकटवा.

भारतातील सेनादले नकाशा



## उपक्रम

खालील नकाशात सैन्यदलाच्या कमांडची सूची तयार करुन त्यांची कार्यक्षेत्रे विविध रंगाच्या साहाय्याने दाखवा.



## उपक्रम

खालील नकाशात वायुसेना व नौसेना मुख्यालय रंगाच्या साहाय्याने दाखवा.



# प्रकरण ७ संरक्षणाच्या दुय्यम संघटना

युद्धकाळात देशाच्या भू-सीमा, हवाई व सागरी सीमांचे रक्षण करण्यासाठी स्थलसेना, वायुसेना आणि नौसेना असतात. ते शत्रूशी लढतात. त्यांना आघाडीवरील सेनादले असे म्हणतात. या सेनादलांच्या जबाबदारी व्यतिरिक्त युद्धकाळात देशाची अंतर्गत सुरक्षा सांभाळून सेनादलांना सहकार्य करणाऱ्या दलांना संरक्षणाची दुय्यम सेनादले असे म्हणतात. ही सेनादले केंद्रीय गृहमंत्रालय व संरक्षण मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असतात.

संरक्षणाची दुय्यम सेनादले शांतता काळात, युद्धकाळात व अंतर्गत अशांततेच्या काळात देशांतर्गत असलेले शस्त्रास्त्र कारखाने, वीजपुरवठा केंद्रे, विमानतळे, रेल्वेस्थानके, पेट्रोल व तेलसाठे, पाणीपुरवठा केंद्रे, बंदरे महत्त्वाची ठिकाणे यांचे रक्षण करणे, यासोबत खालील कामे करतात.

## दुय्यम सेनादलाची कामे

- देशांतर्गत सुव्यवस्था निर्माण करणे.
- नागरी प्रशासनास मदत करून स्थिरता निर्माण करणे.
- समुद्रकिनाऱ्याचे रक्षण करणे.
- शांतताकाळात सीमांचे रक्षण करणे.
- युद्धकाळात महत्त्वाचे रस्ते व पूल आणि महत्त्वाची ठिकाणे यांचे रक्षण करणे इत्यादी.

संरक्षणाच्या दुय्यम सेनादलामध्ये अनेक सेनादलाचा समावेश होतो. केंद्रीय गृह मंत्रालयाखाली असलेली दले यांना केंद्रीय सशस्त्र पोलीस दले असे म्हणतात. यात प्रामुख्याने सीमा सुरक्षा दल, इंडो तिबेट सीमा पोलीस दल, आणि आसाम रायफल यांचा समावेश होतो. तर भारतीय नौदलाच्या नियंत्रणाखाली तट रक्षक दलाचा समावेश होतो.

### अ) सीमा सुरक्षा दल :

सीमा सुरक्षा दलाची स्थापना १ डिसेंबर १९६५ रोजी झाली. या सेनादलावर केंद्रीय गृहखात्याचे नियंत्रण असते. सीमा सुरक्षा दलाच्या प्रमुखाचा हुद्दा 'महानिदेशक सीमा सुरक्षा दल' असतो. या सुरक्षा दलाच्या स्थलसेनेप्रमाणे अनेक तुकड्या (बटालियन्स) आहेत. सीमा सुरक्षा दल प्रामुख्याने शांतताकाळात भारत-पाकिस्तान व भारत-बांग्लादेश सीमा रक्षणाचे कार्य करते.

**कार्य :**

१) शांतता काळात देशाच्या भू सीमांचे रक्षण करणे.

२) भारतीय सीमांचे उल्लंघन करणाऱ्या घुसखोरांचा व तस्करांचा बंदोबस्त करणे.

३) कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने नागरी प्रशासनास मदत करणे.

४) सीमेपलीकडून घुसखोरी करणाऱ्या दहशतवाद्यांना अटकाव करणे इत्यादी.

**ब) भारत तिबेट सीमा पोलीस दल :** भारताच्या उत्तर सीमेच्या रक्षणासाठी भारत तिबेट सीमा पोलीस दलाची २४ ऑक्टोबर १९६२ रोजी स्थापना करण्यात आली. हे सीमा पोलीस दल गृहमंत्रालयाच्या नियंत्रणाखाली काम करते. या दलातील सैनिक काराकोरम पर्वतापासून जम्मू काश्मीरमधील लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडच्या पर्वतीय सीमा प्रदेशात कार्य करतात.



**मुख्य कामे :**

१) सीमा व सीमाप्रदेशाचे रक्षण करणे.

२) सीमा प्रदेशातील निवडक प्रवेश मार्गावर (खिंडीवर) पहारा देणे.

३) सीमा प्रदेशातून बेकायदेशीर प्रवेश करणाऱ्यांवर, गुन्हेगारांवर व बेकायदा वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करणे इत्यादी.

**क) आसाम रायफल्स :** आसाम रायफल्स हे सर्वात जुने निमलष्करी सेनादल आहे. त्याची स्थापना १८३५ मध्ये कच्चारलेव्ही म्हणून करण्यात आली. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात चांगली कामगिरी केली म्हणून या सेना दलाचा गौरव करण्यात आला. त्यावेळेपासून या सेना दलास आसाम रायफल्स म्हणून ओळखण्यात येत आहे. या सेना दलाचे मुख्य कार्यालय शिलाँग येथे आहे.



**कार्य :**

१) भारताच्या ईशान्य सीमेची सुरक्षा करणे.

२) ईशान्य भारतातील राज्यांमधील बंडखोरीविरूद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करणे.

३) नागरी असंतोष नियंत्रित करून नागरी प्रशासनास मदत करणे.

४) ईशान्येकडील राज्यांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत करणे इत्यादी.

**ड) तट रक्षक दल :** तट रक्षक दल हे सागरी सुरक्षा सांभाळणारे नौसेना, मासेमारी व महसूल मंत्रालयाशी संलग्न कामे करणारे बहुकर्मी निमलष्करी सेनादल आहे. या सेनादलाची सुरुवात १ फेब्रुवारी १९७७ रोजी झाली व कायमस्वरूपी संघटनेची स्थापना १९ ऑगस्ट १९७८ रोजी झाली. तट रक्षक दलाच्या प्रमुखाचा हुद्दा 'महानिदेशक तट रक्षक दल' असतो. या दलाचा कारभार संरक्षण मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली चालतो. तट रक्षक दलाचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे आहे.

**कार्य :**

(१) तट रक्षक दलाचे मुख्य काम हे भारताच्या अंदाजे २० दशलक्ष चौरस किमी सागरी क्षेत्र व अंदाजे ७००० किमी लांबीच्या समुद्रकिनाऱ्याचे रक्षण करणे आहे.

(२) सागरी तस्करी व चाचेगिरीवर नियंत्रण ठेवणे.

(३) भारतीय मत्स्यव्यवसायास संरक्षण देणे व मदत करणे.

(४) भारताच्या समुद्र किनाऱ्यावर व सागरी पर्यावरणावर नियंत्रण ठेवणे.

(५) सागरी संपत्तीचे रक्षण करणे.

(६) सागरी विज्ञान व संशोधनासाठी उपयुक्त माहितीचे संकलन करणे, इत्यादी.

## उपक्रम

१. तट रक्षक दल व सीमा सुरक्षा दल यांच्या कार्यांमधील फरक लिहा.

२. निमलष्करी दलाच्या सैनिकाची मुलाखत. (खालील मुद्द्यांच्या आधारे लिहा.)

अ) सैनिकाचे नाव :

ब) सध्या कार्यरत कार्यालय :

क) नेमणूक कधी झाली? :

ड) पात्रता काय लागते? :

इ) सैन्यात का जावे वाटले?

ई) सेवा काळातील उल्लेखनीय कामगिरी सांगा?

ज) अविस्मरणीय प्रसंग सांगा.

झ) संदेश

३. भारत-तिबेट सीमा पोलीस दल आणि आसाम रायफल्स यांच्या कार्यातील फरक लिहा.

४. भूमिका अभिनय : (वर्गातील मुलांचे चार गट पाडून दुय्यम सेनादलाच्या कामाचे सादरीकरण) तुमच्या भूमिकेतील अनुभव लिहा.

## उपक्रम

भारत-तिबेट सीमा पोलीस दल आणि आसाम रायफल्स यांची कार्यक्षेत्रे भारताच्या आराखड्यात दाखवा.



# प्रकरण ८ पोलीस दले

देशांतर्गत शांतता व सुरक्षा राखण्यासाठी विविध प्रकारची पोलीस दले अस्तित्वात आहेत. त्यांत प्रामुख्याने भारतातील प्रत्येक घटक राज्याचे स्वतंत्र पोलीस दल असते. त्यांच्याच जोडीला राज्यात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास, सार्वत्रिक निवडणुका, सण, उत्सव आणि नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात नागरी प्रशासनास कायदा व सुव्यवस्था सांभाळण्यासाठी इतर पोलीस दले मदत करत असतात. त्यात मुख्यत:

**अ) केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) :** केंद्रीय राखीव पोलीस दल हे केंद्रीय गृहमंत्रालयाच्या नियंत्रणाखाली काम करणारे सर्वांत मोठे निमलष्करी दल आहे. याची स्थापना १९३९ मध्ये झाली. या दलाचे प्रमुख 'महानिदेशक केंद्रीय राखीव पोलीस' हे असतात. या दलाने गौरवशाली सेवा दिली आहे. केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या एकूण २४० बटालियन्स असून त्यात सहा महिला बटालियन्स आहेत. त्या देशाच्या विविध भागांत कार्यरत आहेत.

**कार्य :**

(१) देशांतर्गत अस्थिरता निर्माण झाल्यास किंवा राज्यात व केंद्रशासित प्रदेशात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामात गरजेनुसार कार्य करणे.

(२) नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरिकांना मदत करणे.

(३) देशद्रोह्यांच्याविरुद्ध संघर्ष करून त्यांचा बीमोड करणे.

(४) युद्धकाळात संरक्षण दलाच्या मदतीकरिता दुय्यम संरक्षणाचे काम करणे इत्यादी.

**ब) राज्य राखीव पोलीस दल (SRPF):** राज्य राखीव पोलीस दल हे भारतातील प्रत्येक राज्यातील गृहमंत्रालयाच्या नियंत्रणाखाली सामान्य पोलीस दलाव्यतिरिक्त सशस्त्र पोलीस दल आहे. त्यालाच राज्य राखीव पोलीस दल किंवा एस आर पी एफ तर काही राज्यात प्रांतीय रक्षक दल या नावाने ओळखले जाते. या दलाचे प्रमुख डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल आर्मड पोलीस हुद्द्याचे अधिकारी असतात. राज्य राखीव पोलीस दलात त्या-त्या राज्यातून भरती केली जाते. प्राथमिक व विशिष्ट प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना जबाबदारीची कामे दिली जातात. राज्यात कायम स्वरूपी छावण्यांमधून त्यांचे प्रशिक्षण सुरू असते. युद्ध काळात त्यांना दुय्यम संरक्षणाची कामे करावी लागतात.

**कार्य :**

(१) उपद्रवी व समाजकंटक गटांचा बंदोबस्त करणे.

(२) राज्यातील पोलिसांना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मदत करणे.

(३) समाजघातकी, नक्षलवादी यांसारख्या सशस्त्र टोळ्यांचा बंदोबस्त करणे इत्यादी.

**क) गृहरक्षक दल (होमगार्ड):** होमगार्ड हे एक स्वयंसेवी संघटन आहे. याची स्थापना १९४८ मध्ये केंद्रीय गृहमंत्रालयाच्या नियंत्रणाखाली विविध राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात झाली आहे. यात समाजातील विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा सहभाग असतो. त्यांच्या अनुभवाचा फायदा संघटनेला मिळतो. होमगार्ड ही ऐच्छिक सेवा आहे. नागरी व्यवस्थापनाला मदत करणारी संघटना म्हणून होमगार्डकडे पाहिले जाते. राज्याच्या होमगार्ड कायदा व नियमांप्रमाणे होमगार्डचे व्यवस्थापन व संघटन सुरू असते. होमगार्ड संघटनेच्या प्रमुखास 'कमांडंट जनरल होमगार्ड' असे म्हणतात. ही संघटना जिल्हा, तालुका व ग्रामीण स्तरावर कार्य करते. त्या-त्या विभागातून होमगार्डची भरती केली जाते. त्यात पुरुष व महिला स्वयंसेवकांचा समावेश असतो. त्यांची शहरी व ग्रामीण अशी वर्गवारी केली जाते. त्यानुसार त्यांना सलग १० ते ४२ दिवसांचे प्राथमिक प्रशिक्षण दिले जाते. तसेच साप्ताहिक कवायत आणि आठ दिवसांचे उजळणी शिबिर पूर्ण करावे लागते.

**कार्य :**

(१) राज्यात व केंद्रशासित प्रदेशात कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियंत्रण, जनसंपत्तीचे रक्षण या कामी सहकार्य करणे.

(२) सामाजिक कल्याणाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणे.

(३) सण व उत्सव, मिरवणुका, सभा आणि निवडणुका या दरम्यानच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यास नागरी प्रशासनास मदत करणे.

(४) नैसर्गिक आपत्ती किंवा देशांतर्गत होणारे बाँबस्फोट, दंगली इत्यादी प्रसंगी जनतेस मदत करून त्याचे मनोधैर्य कायम राखण्यास मदत करणे.

(५) जातीय सलोखा निर्माण करून समाज भयमुक्त करण्याच्या कामात सहभागी होणे इत्यादी.

**ड) नागरी संरक्षण (Civil Defence) :** शत्रूच्या हवाई हल्ल्यापासून आपल्या देशातील जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी जी संघटना बचाव कार्य करते त्या संघटनेला नागरी संरक्षण संघटना असे म्हणतात. आकाराने मोठ्या असलेल्या भारतात नागरी संरक्षण ही प्रत्येक राज्य शासनाची जबाबदारी आहे. नागरी संरक्षण संघटनेचे धोरण, नियंत्रण व कार्यवाही संपूर्ण देश पातळीवर होणे आवश्यक असते. ती जबाबदारी 'महानिदेशक नागरी संरक्षण' यांची असते. तर राज्यात 'निदेशक नागरी संरक्षण' यांची जबाबदारी असते.

नागरी संरक्षण सेवेची रचना केंद्र, राज्य व जिल्हा अशी त्रिस्तरीय असते. त्या-त्या पातळीवर त्याचे कार्य सुरू असते. यात संरक्षण सेवेतील निवृत्त अधिकारी, सार्वजनिक संघटनेचे नेते, औद्योगिक क्षेत्रातील अधिकारी, पोस्ट, टेलिग्राफ सेवेतील अधिकारी, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, तंत्रज्ञ यांचा समावेश असतो.

**कार्य :** शत्रूने केलेल्या हवाई हल्ल्यातून जीवित व वित्तहानी होऊ नये. यासाठी नागरी संरक्षण संघटना पुढीलप्रमाणे कार्ये करत असते.

(१) शत्रूने फेकलेले बाँब निकामी करणे.
(२) सूचना यंत्रणा राबवणे.
(३) प्रकाशबंदी करणे.
(४) जखमींना वैद्यकीय मदत करणे.
(५) आग विझवणे.
(६) संपत्तीचे रक्षण करणे.
(७) सैनिक कल्याण केंद्राची स्थापना करणे इत्यादी.

## उपक्रम

**(१) पोलीसाची मुलाखत**

(अ) पोलीसाचे नाव व हुद्दा

........................................................................................................

(ब) सध्या कार्यरत पोलीस ठाणे व विभाग

........................................................................................................

........................................................................................................

(क) सेवा कालावधी

........................................................................................................

........................................................................................................

(ड) शिक्षण-प्रशिक्षण

........................................................................................................

........................................................................................................

(इ) सेवा काळातील अनुभव

........................................................................................................

........................................................................................................

(ई) तरुणांना काय संदेश

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

२. जवळच्या पोलीस ठाण्यास क्षेत्रभेट देऊन तेथील कामकाजाची माहिती मिळवा व ती येथे लिहा.

# प्रकरण ९ लष्करातील सेवा संधी

लष्करातील सेवा ही देशाकरिता अत्यंत महत्त्वाची, प्रामाणिकपणाची आणि समाधानकारक अनुभव देणारी आहे. लष्करात भरती होण्यासाठी ढोबळपणे तीन टप्पे आहेत.

१) १० वी (SSC) परीक्षा पास झाल्यानंतर

२) १२ वी (HSC) परीक्षा पास झाल्यानंतर

३) मान्यता प्राप्त विद्यापीठातून पदवी प्राप्त केल्यानंतर

## लष्करी सेवेत भरती स्तर

लष्करात भरती होण्यासाठी आपल्या पात्रतेनुसार विविध स्तर आहेत. ते पुढीलप्रमाणे –

**(१) प्रथम श्रेणी वर्ग – १ – सनदी अधिकारी**

**(२) द्‌वितीय श्रेणी वर्ग – २ – किंवा ब गट (सनदी अधिकारी)**

**(३) तृतीय श्रेणी वर्ग – २ – किंवा ब गट (बिनसनदी अधिकारी)**

**(४) चतुर्थ श्रेणी – वर्ग – ३ – किंवा क गट**

**(५) पंचम श्रेणी – किंवा ड वर्ग यात कुशल किंवा अर्ध कुशल कामगारांची भरती केली जाते.**

## लष्करातील भरतीचे मूलभूत घटक

- **वयोमर्यादा – नियमात दर्शविल्याप्रमाणे**
- **शारीरिक पात्रता – नियमानुसार किमान उंची, वजन, छाती**
- **वैद्यकीय पात्रता – नियमानुसार**
- **शैक्षणिक पात्रता – नियमानुसार**

## लष्करी व निम लष्करी दलात महिलांना संधी

- **सैन्यदल :** सनदी अधिकारी हुद्द्यावर विद्यापीठातून पदवी प्राप्त केल्यानंतर प्रथम वर्ग सनदी अधिकारी म्हणून महिलांना सैन्यदलात जाता येते.
- **निम लष्करी दल :** CRPF, BSF व ITBP यात अधिकारी गट आणि त्या खालील गटात महिलांसाठी संधी उपलब्ध आहेत.

## अर्ज करण्याच्या पद्धती

लष्करातील विविध स्तरावर व विविध सेवांसाठी अर्ज करण्यासाठी विविध संकेतस्थळे दिलेली आहेत. त्यांचा उपयोग करावा. ती संकेतस्थळे पुढीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| (१) स्थलसेना | - http://www.joinindianarmy.nic.in/index.htm |
| (२) नौसेना | - http://www.joinindiannavy.gov.in |
| (३) हवाईसेना | - http://www.careerirforce.nic.in/index.l.aso1kabg |
| | - http://airmenselection.in/en/career.htm |
| (४) सीमा सुरक्षा दल | - http://bsf.nic.in/en/career.htm |
| (५) केंद्रीय राखीव पोलीस दल | - http://crpfnic.in/carrer/prospects |
| (६) इंडो तिबेट सीमा पोलीस | - http://recruitmentitbpolice.nic.in |
| (७) सशस्त्र सीमा दल | - http://www.ssb.nic.in/index.,aspx?lsid |
| (८) केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल | - http://www.cisf.nic.in |
| (९) आसाम रायफल्स | - http://www.assamrifles.gov.in |

याशिवाय आठवड्याच्या Employment News वर्तमान पत्रातून माहिती मिळवा.





**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

मराठी संरक्षणशास्त्र (कार्यपुस्तिका) इयत्ता नववी

₹ ३८.००

